संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# खाजगी कर्मचाऱ्यांना अपेक्षित निवृत्ती वेतन

**निवडणुकांच्या** धामधुमीत अनेक महत्वाच्या निर्णयांकडे किंवा मुद्यांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे. सर्वसामान्य कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा देण्याचे काम सर्वोच्च न्यायालयाने केले आहे. खाजगी क्षेत्रात काम केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी निवृत्तीवेतन हे जवळपास नसल्यासारखीच परिस्थिती असते. कितीही मोठ्या पदावरून व्यक्ती निवृत्त झाली तरी तिच्या निवृत्तीवेतनाची मर्यादा कमीत कमी अडीच हजार तर जास्तीत जास्त दहा ते पंधरा हजारापर्यंत जाते. परंतु आता सर्वोच्च न्यायालयाने एक मोठा निर्णय घेऊन खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन ठरवताना निवृत्तीपूर्वीचा अखेरचा पूर्ण पगार विचारात घ्यावा असा आदेश दिला. परिणामी खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनात तब्बल पाचपट वाढ होऊ शकते. यापूर्वी या खाजगी आस्थापनातील कर्मचाऱ्यांना पंधरा हजाराच्या अंशदानाचा निकष मान्य केला गेला होता. म्हणजेच पंधरा हजाराच्या ८.३३ टक्के या दराने निवृत्ती वेतनाचे दर ठरवले गेले होते. परंतु हा पंधरा हजाराचा निकष न मानता निवृत्तीवेळी जो पगार असेल तो प्रमाण मानला जावा.यसंदर्भात न्यायालयात याचिकेची सुनावणी सुरु होती. आणि आता या नव्या निकषानुसार निवृत्तीवेतनाचे दर नक्की करण्याचे न्यायालयाने आदेश दिले आहेत. भविष्य निर्वाह निधी संघटनेने कर्मचारी संघटनांच्या मागणीला विरोध केला होता. आता सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्देश अंतीम मानला पाहिजे. आणि विशेष म्हणजे सरकारने त्याला विरोध न करता त्याला मान्यता दिली पाहिजे. सरकारी खात्यातही निवृत्त होताना जो पगार मिळत असतो त्या आधारावरच निवृत्तीवेतनाची निश्चिती होते. मग खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांवर असा अन्याय करण्याचे कारणच उरत नाही. त्यातून कर्मचाऱ्यांच्या पगारातूनच निवृत्तीवेतनाचीही रक्कम दर महिन्याला कापली जात असते. त्यामध्ये योग्य ती भर घालण्याचे काम संबंधित कंपन्या करीत नाहीत. मग भविष्यनिर्वाह निधीकडे जमा होणाऱ्या या रकमेच्या व्याजाचा विचार करून निवृत्ती वेतन दिले जात असते. खाजगी कंपन्यांमध्ये सामान्य कर्मचाऱ्यांना विशेषतः तृतीय आणि चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना दिला जाणारा पगारही कमी असतो. त्यांना काही सरकारी वेतन आयोगाप्रमाणे पगारवाढ मिळत नाही.

### तुटपुंजे निवृत्तीवेतन

ही परिस्थिती लक्षात घेतली तर त्यांना मिळणारे निवृत्तीवेतन हे अतिशय तुटपुंजे असते.एवढेच नव्हे तर त्यांच्या नावाने साठवलेला भविष्यनिर्वाहनिधीसुध्दा जेमतेम स्वरुपाचाच असतो. या सर्व गोष्टींचा विचार केला तर उतारवयामध्ये मिळणारे निवृत्तीवेतन जर पुरेसे नसेल तर त्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाचेदेखील हालच होतात. म्हणजेच त्यांना निवृत्तीनंतरही कुठे ना कुठे उपजिवीका चालवण्याकरीता काम करण्याची वेळ येते. आज देशभरामध्ये जवळपास पाच कोटीपेक्षा जास्त खाजगी कंपन्यांमध्ये काम करणारे कर्मचारी आहेत. आणि या सर्वांचे सरासरी निवृत्तीवेतन जर अडीच हजार ते पंधरा हजाराच्या दरम्यान असेल तर त्यांच्यावर एक फार मोठा आर्थिक अन्याय होतो असेच त्याचे वर्णन करावे लागते. निवडणुकीच्या काळात या गोष्टीकडे राज्यकर्त्यांचे किंवा सरकारी कार्यालयांचे कितपत लक्ष जाईल याबद्दल शंका आहे. परंतु सध्या वेगवेगळे प्रत्यक्ष जाहिरनामे काढून आश्वासनांची खिरापत वाटत आहे अशांनी या खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाचा प्रश्न उचलला पाहिजे. आणि पाच पट निवृत्तीवेतनाची हमी दिली पाहिजे. अडीच हजार रुपये निवृत्तीवेतन मिळणाऱ्याला जर दहा हजार निवृत्तीवेतन मिळाले तर तो आपले महिनाभराचा किमान खर्च भागवू शकेल एकीकडे देशातील प्रत्येक नागरीकाची आर्थिक स्थिती चांगली असावी. अशा वल्गना केल्या जातात. अगदी शेतकऱ्यालासुध्दा वर्षाकाठी ७२ हजारापासून ते एक लाखापर्यंत पैशांचे आश्वासन दिले जाते. मग सर्वाधिक संख्येने असलेल्या खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या उतारवयात पुरेसे ठरेल एवढे निवृत्तीवेतन मिळायला हवे. यामध्ये सरकार त्यांच्यावर कोणतेही उपकार करत नाही त्यांच्याच पगारातल्या पैशातून हे निवृत्तीवेतन दिले जात असते. त्यात कदाचित भविष्यनिर्वाहनिधी कार्यालयाला थोडी ज्यादा रक्कम घालण्याची वेळ येऊ शकेल. ती तयारी सरकारने दाखवली पाहिजे. शेवटी या खाजगी कर्मचाऱ्यांना मिळणारी निवृत्तीवेतनाची रक्कम एकूणच देशाच्याच अर्थव्यवहारामध्ये उपयोगात येणारी आहे. पण त्यांच्याकडून घेतलेला पैसा साठवून ठेवायचा त्याच्यावर दरवर्षी भरपूर व्याज कमवायचे आणि त्या तुलनेत कर्मचाऱ्यांच्या झोळीमध्ये मात्र किरकोळ स्वरुपाचे निवृत्तीवेतन द्यायचे ही सरळ सरळ लबाडी ठरते.

### निधी कार्यालयाकडे भरपूर पैसा

आजच्या बदलत्या काळाचा विचार केला तर वाढत्या खर्चाच्या तुलनेत पुरेसे निवृत्तीवेतन मिळायला हवे. सरकारी कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतनही बंद केलेले आहे. परंतु त्यांचे निवृत्ती वेतन ठरवताना शेवटच्या पगाराचा निकष मानला जातो. त्यामुळे त्यांच्या हातामध्ये बऱ्यापैकी रक्कम मिळू शकते. शिवाय त्यांच्या पगारातून वजा होणारी रक्कमदेखील बरीच मोठी असल्याने त्यांचे निवृत्तीवेतन समाधानकारक स्वरुपाचे असते. खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचाच हा मुख्य प्रश्न असून सरकारने आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करावी, पाचपट जरी वाढ गृहित धरली तरी या कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतनही जास्तीत जास्त दहा ते पंचवीस हजार याच दरम्यान राहाणार आहे. आज भविष्यनिर्वाहनिधी कार्यालयाकडे काही लाख कोटी रुपये जमा होत राहतात आणि ते कुठे आणि कसे गुंतवायचे असा या कार्यालयाला प्रश्न पडत असतो. चार वर्षापूर्वीच हा गुंतवलेला पैसा शेअर बाजारामध्ये गुंतवायला मंजुरी दिली गेली. म्हणजे त्यातूनही अधिक उत्पन्न मिळणे शक्य झाले आहे. कर्मचाऱ्यांच्या या पैशाचा सरकारी योजनांसाठीही मोठा उपयोग होतो पण कर्मचाऱ्यांना मात्र त्या तुलनेत फारच तुटपुंजा परतावा मिळतो. काळाची गरज ओळखून ही वाढ योग्यवेळी त्या कर्मचाऱ्यांच्या पदरात पडू शकेल.